REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 6 | MARCH - 2018

# प्रसिध्द लेखक वि . स . खांडेकर

डॉ . बिळूरे श्रीदेवी रामचंद्र
मराठी विभाग,गुलबर्गा विश्वविदयालय, कलबुर्गी .




**विष्णू सखाराम खांडेकर (11 जानेवारी 1898 - 2 सप्टेंबर 1976)**
**हे मराठी कादंबरीकार लेखक होते .**

**जन्म नाव-गणेश आत्माराम खांडेकर**
**जन्म- 11 जानेवारी 1898 सांगली**
**मृत्यू - 2 सप्टेंबर 1976 मिरज**
**व्यवसाय - लेखक**
**कार्यक्षेत्र-कादंबरीकार**
**भाषा-मराठी**
**साहित्य प्रकार-कादंबरी**
**प्रसिध्द साहित्यकृती-ययाति**
**अपत्ये- मंदाकिनी**
**लक्षवेधक कार्य -ययाति, क्रौंचवध, उल्का**
**लक्षवेधक पुरस्कार-ज्ञानपीठ पुरस्कार**

## पूर्वायुष्य

वि .स . खांडेकर हे भारत देशातील प्रतिष्ठित ज्ञानपीठ पुरस्कार मिळविणारे प्रसिध्द लेखक होते . त्यांचा जन्म सांगली जिल्ह्यात झाला . त्यांच्या पूर्वायुष्यात त्यांना नाटकांमध्ये अभिनय आणि दिग्दर्शन करण्याची आवड होती . वि .स . खांडेकरांचे लेखन ध्येयवादी आहे . अंतःकरणात समाजकल्याणाची व प्रगतिची तळमळ आहे . लालित्यपूर्ण भाषा रम्य कल्पना कोटीवाज पणा व

समाजहिताचा प्रचार हि त्यांच्या लघुकथेचीवैशिष्ट आहेत. कल्पना शक्ती अतिशय तल्लख असल्याने तेजस्वी लेखनातून मनोरंजन करण्याबरोबर समाजजीवनावर भाष्य करणे हे त्याच्या लेखनाचे स्वरूप होते. खांडेकरांच्या लेखनातून माणूसकीचा गहीवर दिसून येतो. त्यांच्या लेखनातून माणसोरील अपार श्रध्दा व्यक्त होते. रूपक कथा हा नवा प्रकार त्यांनी रूढ केला.

## व्यावसायीक व वाङ्मयीन योगदान

**1920**साली खांडेकरांनी शिरोदे या लहानश्या खेडयात शिक्षक म्हणून काम करण्यास सुरवात केली. सध्या शिरोद हे गाव महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कोनार्क या प्रदेशात येते. **1932** पर्यंत त्यांनी याच शाळेत काम केले. खांडेकरांनी आपल्या जीवनातील बहुमोल वेळ हा मराठी साहित्य क्षेत्रासाठी खर्ची घातला. त्यांनी विविध साहित्य प्रकारांचे लेखन केले त्यात त्यांनी **16** कादंबरया,**6** नाटके, **250** लघुकथा, **50** रूपककथा, दृष्टांत कथा, **100** निबंध **200** समिक्षा लिहिल्या आहे. त्यांनी मराठी व्याकरणांमध्ये खांडेकरी अलंकाराचा शोध लावला.चित्रपट नाटक व्यक्तीचित्रे कविता अनुवाद अशा विपुल असे लेखन केले. वृत्तपत्रिय लेखन व ग्रंथसंपादन या क्षेत्रातही त्यांनी ठसा उमटवला.

चना कौशल्य व तंत्रनिपुणता खांडेकरांच्या कथेत आढळून येत नाही. पण कथा लेखनातून व्यक्त होणारे जीवनदर्शन आणि योगनिष्ठा वाचकांना प्रभावित करतात.म्हणूनच तर वि .स. खांडेकर हे जीवनवादी लेखक म्हणून ओळखले जातात.जूवनासाठी कला हे त्यांच्या सम्गग्र लेखनाचे सूत्र होते.

## पुरस्कार आणि सन्मान

- **1941** मध्ये खांडेकरांची वार्षिक मराठी साहित्य सम्मेलन सोलापूर च्या अध्यक्षपदी निवड झाली.
- **1968** साली साहित्यावरील योगदानासाठी त्यांना भारत सरकारने पदमभूषण पुरस्काराने सन्मानित केले.
- त्यानंतर दोन वर्षानी त्यांना इंडियन साहित्य अकादमी फेलोशिप हा पुरस्कार इंडियन साहित्य अकादमी ने प्रदान केला.
- ययाति या साहित्य निर्मिती साठी **1974** साली ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित केले.
- **1998** साली कोल्हापूरच्या शिवाजी विदयापीठानेत्यांना डी.लिट. ही पदवी बहाल केली.
- भारत सरकारने वि.स.च्या स्मरणार्थ पोस्टाचे तिकीट जारी केले.

## प्रसिध्द साहित्य

ययाति

खांडेकरांच्या ययाति या कादंबरीला **3** पुरस्कार मिळाले आहेत

1) महाराष्ट्र राज्य पुरस्कार **1960**
2) साहित्य अकादमी पुरस्कार **1960**
3) ज्ञानपीठ पुरस्कार **1974**

## खांडेकर लिखीत पुस्तके

- कांचनमृग **1931**
- उल्का **1934**
- अमृतवेल
- सुखाचा शोध
- हिरवा चाफा **1938** इ.
- अजून येतो वास फुलांना
- अविनाश
- अश्रू
- अश्रू आणि हास्य

- आगरकर व्यक्ती आणि विचार
- उःशाप
- कल्पलता
- कालची स्वप्ने
- कालिका
- कौंचवध
- घरटे
- घरटयाबाहेर
- चंदेरी वस्त्रे
- चांदण्यात जळलेला मोहर 1947 इ. .

## इतर साहित्य

- अभिषेक
- ढगाआडचे चांदणे
- दवबिंदू
- प्रसाद
- मुखवटे
- रानफुले इ.
- जीवनशिल्पी
- झिमझिम
- तिसरा प्रहर
- तुरूंगातील पत्रे भाग 1 2 3
- ते दिवस ती माणसे
- दोन ध्रुव 1934
- दोन मने 1938
- धुके
- नवा प्रातःकाल
- पहिली लाट
- पहिले पान
- पहिले प्रेम 1940
- पाकळया
- पांढरे ढग 1949
- पारिजात भाग 1 2
- पाषाण पूजन
- फुल आणि काटे
- फुल आणि दगड
- रिकामा देव्हारा 1939
- वेचलेली फुल कथासंग्रह 1948
- हृदयाची हाक इ. .

त्यांच्या कथा कादंबरयांवर अनेक भाषांमध्ये चित्रपट दूरदर्शन मालिकाही निर्माण झाल्या. त्यांच्या साहित्याचे अन्य भारतीय व विदेशी भाषात अनुवाद झाले त्यांच्या उल्का या कादंबरीवर चित्रपट निघाला.

छाया,ज्वाला,देवता,धर्मपत्नी,अमृत परेदशी इ.

त्यांनी 'लग्न पहावे करून' **1940** या मराठी चित्रपटासाठी संवाद लेखन केले.

अश्या प्रकारे वि.सं नी अशा एक न अनेक साहित्य प्रकारांचे लेखन केले त्यांच्या या अथांग साहित्य सागरातील माझ्या मनावर प्रभाव पाडणारी एक उत्कृष्ट कादंबरी म्हणजे 'ययाति' भारतीयज्ञानपीठाचा 'वाग्देवी'पुरस्कार **1974** साली मिळालेली वि.स. खांडेकरांची आतिउत्कृष्ट कादंबरी कै. वि.स.खांडेकर यांच्या एकूण साहित्यकृतींच्या रत्नमाळेतील ययातिचे स्थान हे मेरूमण्यासारखे आहे.

या कादंबरीचा पुराणाशी केवळ नावापुरता संबंध नाही. एका प्रसिध्द पौराणिक उपाख्यानाचे धागेदोरे घेऊन ते त्यांनी या कादंबरीत स्वतंत्र रीतीने गुंफले आहेत.आपल्या प्रतिभेची जात,तिची शक्ती आणि तिच्या मर्यादा यांची योग्य जाणीव झालेल्या खांडेकरांनी आत्मविष्काराला योग्य अशीच कथा निवडली. ती ज्या माध्यमातून त्यांना प्रगट व्हावीशी वाटली त्याच्यावर त्यांचे प्रभुत्व होतेच. पुराणकथात जे भव्यभीषण आढळतात यांचे मंथन करण्याची अंगभूत शक्तीही त्यांच्या चिंतनात होती. जीवन जसे एका दृष्टीने क्षणभंगुर आहे तसेच ते दुसरया दृष्टीने चिरंतन आहे. ते जितके भौतिक आहे तितकेच आत्मिक आहे या कठोर सत्याचे आकलनही त्यांना पूर्णत्वाने झालेले होते.त्यामुळेच एका पौराणिक कथेच्या आधाराने एक सर्व्वोत्तम ललितकृती कशी निर्माण करताा येते याचा आदर्श वस्तुपाठच ययाति च्या रूपाने श्री खांडेकरांनी वाचकांपुढे ठेवला आहे. कामुक, लंपट स्वप्नातही ज्याला संयम ठाऊक नाही असा ययाति, अहंकारी, महत्त्वकांक्षी मनात दंश धरणारी आणि प्रेमभंगाने अंतरंगात व्दिधा झालेली देवयानी स्वतःच्या सुखाच्या पलीकडे सहज पहाणारी आणि ययातिवर शरीरसुखाच्या, वासनातृप्तीच्या पलीकडच्या प्रेमाचा वर्षाव करणारी शर्मिष्ठा आणि निरपेक्ष प्रेम हाच ज्याचा स्वभावधर्म होऊन बसला आहे असा विचारी,संयमी व ध्येयवादी कच या चार प्रमुख पात्रांमधील परस्परप्रेमाची विविध स्वरूपे या कादंबरीत समर्थपणे चित्रित झाली आहेत.ही कादंबरी ययातीची कामकथा, देवयानीची संसारकथा,शर्मिष्ठेची प्रेमकथा आहे आणि कचाची भक्तीगाथा आहे हे लक्षात घेऊन वाचकांनी ती वाचावी अशी अपेक्षा स्वतः खांडेकरांनीच प्रकटपणे व्यक्तकेली आहे.

## संदर्भ


- वि.स. खांडेकर. कॉम.
- मिनिस्ट्री ऑफ होम अफेअर्स
- वि.स. खांडेकर देशमुख आणि कंपनी प्रकाशन